# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २०/०७/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**१) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत पाटणे टाऊन घर क्र ३९७ वार्ड क्र १ फेटरी येथे दि. १८/०७/२०२२ चे २३.३० वा. ते १९/०७/२०२२ चे ०४.३० दरम्यान फिर्यादी नामे– दिपक रामभाऊ वैद्य वय ५३ वर्ष, रा. पाटणे टाऊन घर क्र ३९७ वार्ड क्र १ फेटरी हे आपल्या परीवारासह आपल्या राहत्या घराच्या समोरील हॉलमध्ये जेवण करुन झोपले होते. रात्री फिर्यादी यांचे आईला बाथरूमला जाणे असल्याने हॉलला लागुन असलेला दरवाजा खोलत नसल्याने फिर्यादी यांनी दरवाजा खोलण्याचा प्रयत्न केला. तेव्हा फिर्यादी यांनी दरवाजा जोरात लाथ मारुन उघडला असता बेडरुममध्ये ठेवलेले सामान अस्तव्यस्त दिसले. तसेच आलमारीमध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने एकुण कि. ३०,०००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेल्याचे दिसले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री अशोक पाठक मो.नं. ९३७०१८३८३१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील विवेकानंद नगर कन्हान येथे दि. १६/०७/२०२२ ते १९/०७/२०२२ चे १०.०० वा. ते १२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– गं. भा. प्रतिभा महिद्र चौरे वय ५० वर्ष रा.विवेकानंद नगर कन्हान या आपल्या घराला कुलुप लावुन सेवाग्राम वर्धा येथे वास्तुकच्या कार्यक्रमाला गेल्या होत्या. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घरी प्रवेश करून रूमचा लॉक तोडुन आलमारीच्या लॉकर मध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने असा एकुण किमंत २८,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार खुशाल रामटेके मो.न. ९२८४२६२५९६ हे करीत आहे.

### जनावर चोरी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत २० कि. मी. अंतरावरील भूगाव शिवार येथे दिनांक १७/०७/२०२२ ते १८/०७/२२ चे २२.०० जे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– विनोद सुरेश आंबिलडूके वय २७ वर्ष रा. भूगाव ता. कामठी यांच्या घरा समोर असलेल्या झोपडीत बांधलेल्या दोन कोसा काळसर रंगाचे बैल व एक लाल रंगाची गाय या पैकी एक कोसा रंगाचा बैल कि. १५,०००/–रु. व एक लाल रंगाची गाय किमत १५,०००/–रु. असा एकुण कि. ३०,०००/– रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक डोईफोडे मो.क्र. ९८२३३०१४७४ हे करीत आहे.

## चोरीचा प्रयत्न

**पो.स्टे. नरखेड** :— अंतर्गत १ कि. मी. अंतरावरील नरखेड इंडिया ए.टी.एम येथे दिनांक १९/०७/२२ चे ०२:२० वा. सुमारास अज्ञात आरोपी याने इंडिया ए.टी.एम नरखेड मध्ये आत प्रवेश करून ए.टी.एम चे सुरक्षा व्दार खोलुन नुकसान केले आहे व त्यातील पैसे काढण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मुस्तफा इकबाल सैफी, रा.नागपुर प्लॉट नं. १०४, शांतीनगर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार शैलेश डोंगरदीवे हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील बि. ९४ केम्प्रोमेक्स इंजिनीयरींग कंपनी एमआयडीसी बोरी येथे दि. १९/०७/२०२२ चे ०९.०० वा. चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— रामराव दादाजी मेश्राम वय ४९ वर्ष, रा.विरसावरकर नगर, बुटीबोरी यांनी आपली एम.एच—४०/बि.ए—१०९५ क्रमांकाची निळया रंगाची पॅशन प्रो मोटरसायकल हि केम्प्रोमेक्स कंपनी प्लॉट क्रं ९४ समोर उभी करून कंपनीचे आतमध्ये गेले. तेथील काम संपताच ते कंपणीचे बाहेर आले असता त्यांना त्यांची मोटरसायकल ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही. तरी फिर्यादीची किंमती १०,०००/—रू. मोटरसायकल अज्ञात आरोपीने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडिसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलिस उपनिरीक्षक अशोक तरमळे मो.क्र. ९५६१५६४८५२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत वर्धन रेस्टॉरन्ट काटोल येथे दि. १८/०७/२०२२ चे ०६.४५ वा. चे ०८.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— मंगेश शेषराव मानकर वय ३९ वर्ष रा.लाडगाव ह.मु.लक्ष्मीनगर काटोल यांनी त्यांची एम. एच—४०/बी.एम—०६०२ क्रमांकाची पैशन प्रो मोटारसायकल वर्धन रेस्टॉरन्ट काटोल येथे उभी करून ठेवली. ते जेवन करून परत आले असता त्यांना त्यांची मोटरसायकल उभी दिसली नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची किंमती २५,०००/—रू. ची मोटरसायकल चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोना सुनिता साठोने मो.क्र. ७७२२०३६७४४ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**